विशेष/ध.आ./मु.सा.वि./२म.

No. 40764

## नोंदणीचे प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९) या अन्वये वर्धा येथील सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य रीतीने नोंदण्यात आलेली आहे.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव न्यु आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज ॲल्युमिनी असोसिएशन, वर्धा, ता. जि. वर्धा

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक F-9152 (W)

प्रशांत रामदासजी कडवे यांस प्रमाणपत्र दिले.

आज दिनांक 3/7/२०20 रोजी माझ्या सहीनिशी दिले.

शिक्का (Assistant Charity Commissioner, Wardha Sub-Region, WARDHA)

सही Anupam 03.07.2020.

पदनाम सहायक धर्मादाय आयुक्त वर्धा

विशेष–ध. आ./मुं. सा. वि/५० म

№ ~~039636~~

सत्यमेव जयते

# नोंदणी प्रमाणपत्र

संस्था नोंदणी अधिनियम, १८६०

(१८६० चा अधिनियम २१)

नोंदणी क्रमांक महा/29/2020

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की, न्यु आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज ॲल्युमिनी असोसिएशन, वर्धा, ता. जि. वर्धा खालील तारखेस संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम २१) अन्वये योग्यरित्या नोंदणी करण्यात आली.

तारीख 6/2/2020 ~~१०~~ रोजी माझ्या सहिनिशी दिले.

Assistant Registrar of Societ[ies] Wardha Sub-Region.

Anupam 06.02.2020

संस्थांचे सहायक निबंधक.

सहायक संस्था निबंधक, वर्धा

(5)

Society is registered under Societies Registration Act, 1860
Reg. No. MAH/ 29/2020 /Wardha
Dated. 6/02/2020
Assistant Registrar of Societies Wardha.

## परिशिष्ट ब

-ज्ञापन-

मेमोरेन्डम ऑफ असोशिएशन

१. संस्थेचे पूर्ण नाव :- " न्यु आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज ॲल्युमिनी असोसिएशन", वर्धा ता.जि. वर्धा

२. संस्थेचा पुर्ण पत्ता :- :- "महिला विकास संस्था, वर्धा ता.जि.वर्धा", द्वारा सचिव :- श्री. अभिजीत विनोद विरुळकर रा. वर्धा ता.जि. वर्धा

Copy was applied for on 6/11/2020
Copy was ready for delivery on 19/11/2020
Copy was delivered and endorsement was made on 19/11/2020

३. संस्थेचे उद्देश :-

१) संस्थेमार्फत या महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थीनी त्यांच्या शैक्षणिक कामात मदत करणे त्यांना मार्गदर्शन करणे.

२) संस्थेमार्फत विद्यार्थी व विद्यार्थीनींना शिक्षणाच्या विषयीचे साहित्य पुरविणे

३) संस्थेमार्फत व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र स्थापण करणे व त्या विषयी मार्गदर्शन करणे. ~~शासकीय प्रोजेक्ट, स्किम,~~ संगणक प्रशिक्षण केंद्र विद्यार्थी व विद्यार्थीनी करीता सुरु करुन त्या बाबत माहिती पुरविणे.

४) संस्थेमार्फत विद्यार्थ्यांच्या विकासाकरीता वाद - विवाद स्पर्धा, परिसंवाद आयोजित करणे व त्यांच्या ज्ञानात भर टाकणे.

५) संस्थेमार्फत भ्रुणहत्या, नशाबंदी अंधश्रध्दानिर्मुलन हुंडाप्रथा, या विषयावर तज्ञ व्यक्तींचे परिसंवाद, व्याख्याने आयोजित करणे. यामुळे समाजावर होणाऱ्या चाँगल्या व वाईट प्रथे विषयी जनजागृती मोहिम राबविणे.

६) संस्थेमार्फत गरीब व होतकरु विद्यार्थी, विद्यार्थीनींना त्यांचा शैक्षणिक स्तर उंचविण्याकरिता त्यांना पुस्तके वह्या, कपडे, पुरविणे. आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थी व विद्यार्थीनींना त्यांच्या शैक्षणिक कामात मदत करणे. त्यांची हुशारी पाहुन शिष्यवृत्ती देणे.

७) संस्थेमार्फत थोर पुरुषांच्या जयंती आयोजित करणे. राष्ट्रीय सण शाळेत आयोजित करणे. ज्यामुळे विद्यार्थी व विद्यार्थीनी मध्ये राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागेल अशा कार्यक्रमाचे आयोजन करणे.

८) संस्थेमार्फत विद्यार्थी व विद्यार्थीनी करीता रक्तदान शिबीरांचे आयोजन करुन त्यांच्यात रक्तदानाविषयीचे महत्व पटवून देणे. त्याकरीता शहरी व ग्रामीण भागात रक्तदानाविषयीचे शिबीर आयोजीत करणे. रुग्णवाहीकेचे सोय करुन दणे

९) संस्थेमार्फत प्राथमिक आरोग्य केंद्र, दवाखाने बालसंगोपन गृहे स्थापण करुन ते चालविणे. सकस आहार विषयीचे शिबीर आयोजित करणे. जेणे करुन सकस आहारामुळे शरिरावर चांगला / वाईट परिणाम होतो या विषयीचा प्रचार प्रसार करणे. लहान मुले - मुली त्यांना सकस आहारविषयी माहिती पुरविणे.

१०) संस्थेमार्फत नृत्य व कला संगीताचे वर्ग सुरु करणे जेणे करुन मुला - मुलींच्या उपजत कला गुणांना वाव मिळेल या करिता प्रयत्न करणे. नृत्य, गायन, कलेच्या महाविद्यालयात स्पर्धा आयोजित करणे.

११) संस्थे मार्फत आजी - माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करणे.

Superintendent, Public Trust Registration Office WARDHA. 9/11/2020

Assistant Charity Commissioner, Wardha Sub-Region, WARDHA (सत्यमेव जयते)

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|

(7)

४. - " न्यु आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज ॲल्युमिनी असोसिएशन ," वर्धा ता.जि. वर्धा या संस्थेच्या नियम व नियमावली प्रमाणे कार्यकारी मंडळावर सदर्हू संस्थेची व्यवस्था व कारभार सोपविण्यात आलेला आहे. अशा पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदाची संपूर्ण, पत्ता, हुद्दा, वय, व्यवसाय व राष्ट्रीयत्त्व खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | सभासदाचे नाव | पत्ता | हुद्दा | वय | व्यवसाय | राष्ट्रीयत्त्व |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. आशिष बबनराव ससनकर | रा. ५० निलम अपार्टमेंट,शासकीय प्रेस सोसायटी जयताळा रोड, नागपूर | अध्यक्ष | ४३ | नोकरी | भारतीय |
| २ | श्री. हेमंत विलासराव मिसाळ | रा. प्रभु नगर, पोस्ट ऑफीस समोर, वर्धा ता.जि. वर्धा | उपाध्यक्ष | ५१ | नोकरी | भारतीय |
| ३ | श्री. मदन भाऊराव इंगळे | रा. वार्ड नं. २१, तुकाराम वार्ड, राम नगर वर्धा ता.जि. वर्धा | सचिव | ५४ | नोकरी | भारतीय |
| ४ | सौ. कांचन धिरज भोयर | रा. केळकर वाडी वर्धा ता.जि. वर्धा | सहसचिव | ३६ | नोकरी | भारतीय |
| ५ | श्री. प्रमोद वासुदेवराव तडस | रा. मांडगाव ता. समुद्रपुर जि. वर्धा | कोषाध्यक्ष | ४६ | नोकरी | भारतीय |
| ६ | श्री. प्रमोद माधवराव आचेगावे | रा. १४७, जुनी मस्जीद, चोंडी ग्राम पंचायत परिसर ताल मुखेड जि. नांदेड | सदस्य | ३८ | नोकरी | भारतीय |
| ७ | श्री.प्रशांत रामदासजी कडवे | रा. ४१२ स्मुती, देवरनकर लेआऊट, वर्धा ता.जि. वर्धा | सदस्य | ४९ | नोकरी | भारतीय |

स्थळ :- वर्धा

दिनांक :- २०/११/१८

आपला विश्वासू

अर्जदार

श्री.प्रशांत रामदासजी कडवे

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

" न्यु आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज ॲल्युमिनी असोसिएशन ," वर्धा ता.जि. वर्धा या संस्थेचे सभासद जाहिर करतात की, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असून वरील उद्देशाने आम्ही एकत्रित येऊन " **न्यु आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज ॲल्युमिनी असोसिएशन ," वर्धा ता.जि. वर्धा** या संस्थेची आज दि. २०/११/१८ रोजी स्थापन केलेलली असून ती संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही या विधानावर सह्या केल्या आहेत.

| अ.क्र. | सभासदाचे नाव | पत्ता | सह्या |
|---|---|---|---|
| १ | श्री. आशिष बबनराव ससनकर | रा. ५० निलम अपार्टमेंट,शासकीय प्रेस सोसायटी जयताळा रोड, नागपूर | |
| २ | श्री. हेमंत विलासराव मिसाळ | रा. प्रभु नगर, पोस्ट ऑफीस समोर, वर्धा ता.जि. वर्धा | |
| ३ | श्री. मदन भाऊराव इंगळे | रा. वार्ड नं. २१, तुकाराम वार्ड, राम नगर वर्धा ता.जि. वर्धा | |
| ४ | सौ. कांचन धिरज भोयर | रा. केळकर वाडी वर्धा ता.जि. वर्धा | |
| ५ | श्री. प्रमोद वासुदेवराव तडस | रा. मांडगाव ता. समुद्रपुर जि. वर्धा | |
| ६ | श्री. प्रमोद माधवराव आचेगावे | रा. १४७, जुनी मस्जीद, चोंडी ग्राम | |
| ७ | श्री.प्रशांत रामदासजी कडवे | रा. ४१२ स्मुती, देवरनकर लेआऊट, वर्धा ता.जि. वर्धा | |

स्थळ :- वर्धा

दिनांक :- २०/११/१८

**वरील सह्या करणाऱ्या सर्व इसमांना मी ओळखतो त्यांनी माझ्या समक्ष या विधानपत्रावर सह्या केल्या आहेत.**

**ॲड. श्रीपाद नरेंद्र कुलकर्णी**

**अमरावती.**

**भ्रमणध्वनी क्रमांक :- ९८२३२६३९४८**

Adv. SHRIPAD N. KULKARNI
Near Mohan Mill
Aalstambh Chowk, New Tow
BADNERA (Amravati)
2580614

Certified to be true copy

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव

Superintendent,
Public Trust Registration Office
WARDHA.

Typed by
Read by
Compared by
19/11/2020

## परिशिष्ट क

-नियम आणि नियमावली-

**" न्यु आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज ॲल्युमिनी असोसिएशन ," वर्धा ता.जि. वर्धा**

१) नियमावलीतील संदर्भीय शब्दाच्या व्याख्या :-

अ) संस्था : संस्था म्हणजे **" न्यु आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेजॲल्युमिनी असोसिएशन ," वर्धा ता.जि. वर्धा** असे समजले जाईल.

ब) अध्यक्ष : अध्यक्ष म्हणजे **" न्यु आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेजॲल्युमिनी असोसिएशन ," वर्धा ता.जि. वर्धा** असे समजले जाईल.

क) उपाध्यक्ष : उपाध्यक्ष म्हणजे **" न्यु आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेजॲल्युमिनी असोसिएशन ," वर्धा ता.जि. वर्धा** या संस्थेचा कार्यकारी मंडळाचा उपाध्यक्ष असे समजले जाईल.

ड) सचिव : सचिव म्हणजे **" न्यु आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेजॲल्युमिनी असोसिएशन ," वर्धा ता.जि. वर्धा** या संस्थेचा कार्यकारी मंडळाचा सचिव असे समजले जाईल.

इ) सहसचिव : सहसचिव म्हणजे **" न्यु आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेजॲल्युमिनी असोसिएशन ," वर्धा ता.जि. वर्धा** या संस्थेचा कार्यकारी मंडळाचा सहसचिव असे समजले जाईल.

ई) कोषाध्यक्ष : कोषाध्यक्ष म्हणजे **" न्यु आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेजॲल्युमिनी असोसिएशन ," वर्धा ता.जि. वर्धा** या संस्थेचा कार्यकारी मंडळाचा कोषाध्यक्ष असे समजले जाईल.

फ) [illegible]

उ) कार्यकारी मंडळ : कार्यकारी मंडळ म्हणजे **" न्यु आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेजॲल्युमिनी असोसिएशन ," वर्धा ता.जि. वर्धा** या संस्थेच्या नियमानुसार कार्यभार सांभाळण्याकरीता निवडून दिलेल्या सभासदांचे समुहाला कार्यकारी मंडळ असे समजले जाईल.

ऊ) सभासद : सभासद म्हणजे **" न्यु आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेजॲल्युमिनी असोसिएशन ," वर्धा ता.जि. वर्धा** या संस्थेचे कार्यकारी मंडळाने बहुमताने स्विकृत केलेली व संस्थेचे नियमानुसार सभासद फी भरलेली व्यक्ती या संस्थेचा सभासद समजली जाईल.

अध्यक्ष　　　उपाध्यक्ष　　　सचिव

(13)

ओ) सभा : सभा म्हणजे **" न्यु आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेजअॅल्युमिनी असोसिएशन ," वर्धा ता.जि. वर्धा** या संस्थेची कार्यकारी मंडळाची वार्षिक सभा समजले जाईल.

२) कार्यक्षेत्र : संस्थेचे कार्यक्षेत्र संपुर्ण महाराष्ट्र राहील.

३) हिशोबाचे वर्ष : १ एप्रिल ३१ मार्च असे राहील.

४) **सभासदत्त्व व त्याची नोंदणीची पद्धती :**

न्यू आर्टस, कामर्स अॅन्ड सायन्स कॉलेज महाविद्यालय

१) १८ वर्षावरील भारतीय व्यक्तिस या संस्थेचा सभासद होता येईल.

२) सभासद होण्याकरीता संस्थेचे अध्यक्ष किंवा सचिव यांचेकडे सभासदस्यत्त्व फी सह लेखी अर्ज करावा लागेल.

३) सभासदाने संस्थेच्या घटनेच्या नियमाप्रमाणे वागण्याचे कबुल केले पाहिजे.

४) सभासद होण्याकरीता आलेले अर्ज संस्थेचे नियमानुसार कार्यकारी मंडळाच्या स्विकृती नंतर त्या व्यक्तिचे नांव संस्थेचे सभासद यादीत समाविष्ट करण्यात येईल.

५) कार्यकारी मंडळाने बहुमताने मंजुर केल्यावरच संस्थेचे सभासद करुन घेण्यात येईलल. अर्ज स्विकारणे किंवा नाकारणे सर्वस्वी कार्यकारी मंडळावर राहील. सभासदस्यत्त्वाचा अर्ज नामंजुर केल्यास सभासद फी परत करण्यात येईल.

५) **सभासदांचे प्रकार :-** या संस्थेचे सभासद दोन प्रकारचे राहतील.

१) **आजीव सभासद :-** संस्थेच्या प्रथम कार्यकारी मंडळातील सभासद हे आजीव सभासद समजले जाईल. आजीव सभासद होण्याकरीता प्रत्येक सभासदाकडुन रु. १०००/- सभासद फी घेतली जाईलल.

२) **साधारण सभासद :-** संस्थेच्या प्रथम कार्यकारी मंडळाच्या व्यतीरीक्त साधारण सभासद होण्याकरीता रु. १०१/- सभासद फी देणाऱ्या व्यक्तिस संस्थेचे साधारण सभासद होता येईल.

६) **सभासदस्यत्त्व रद्द होणें :-** खालील कारणामुळे सभासदस्यत्त्व रद्द होऊ शकेल.

१) सभासदाने सभासदस्यत्त्वाचा राजीनामा दिल्यास.

२) सभासदाचा मृत्यु झाल्यास.

३) सभासदाने वार्षिक सभासद फी न दिल्यास.

४) सभासदास न्यायालयाने फौजदारी किंवा नैतिक गुन्ह्यात दोषी ठरविल्यास किंवा नादार घोषीत केल्यास.

५) सभासद संस्थेला नुकसान पोहचवित असल्याचे किंवा संस्थेचे पैशाची अफरातफर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास कार्यकारी मंडळाच्या सभेत २/३ बहुमताने ठराव मंजुर करुन सभासदस्यत्त्व रद्द होऊ शकेल.

६) नोटीस देऊन सुद्धा कोणतेही कारण न सांगता तिन वेळेस गैरहजर राहणाऱ्या सदस्यांचे सभासदस्यत्त्व रद्द करता येईल.

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

15

७) **सर्वसाधारण सभा तीचे अधिकार व कर्तव्य :-**

१) सर्वसाधारण सभा ही संस्थेची सर्वश्रेष्ठ व अंतिम निर्णय देणारी सभा समजली जाईल.

२) या सभेत सर्व प्रकारचे सभासद भाग घेऊ शकतील.

३) ही सभा वर्षातून एकदा घेण्यात येईल.

४) कार्यकारी मंडळाने चालविलेल्या कार्यावर नियंत्रण ठेवणे व केलेल्या कामाचा आढावा घेणे.

५) पुढील वर्षाच्या कार्याची रुपरेषास ठरविणे.

६) संस्थेचे उद्देशात वाढ किंवा बदल मंजुर करणे.

७) संस्थेचे नियम आणि नियमावलीत बदल मंजूर करणे.

८) संस्थेचे कार्यकारी मंडळाची मुदत संपल्यावर नवीन कार्यकारी मंडळाची निवड करणे.

९) अध्यक्षांच्या परवानगीने होणारे ठराव सभेसमोर मांडून मंजूर करणे अगर नामंजूर करणे.

८) **सर्वसाधारण सभेची सुचना व गणसंख्या :-**

१) सर्वसाधारण सभेची सूचना सर्व सभासदांना १० दिवस अगोदर मिळेल अशी पाठविण्यात येईल.

२) सभेची सूचना एक बुकात सही घेवून किंवा पोस्टाने पाठविण्यात येईल.

३) सभेचेच सुचनेत सभेची तारीख, सभेचे ठिकाण, सभेची वेळ व सभेतील विषय नमूद करण्यात येतील.

४) एकुण सभासदांचे २/३ सभासद सभेला हजर असल्यांस सभेची गणसंख्या पुर्ण झाली असे समजण्यात येईल.

५) गणसंख्येअभावी सभा ठरलेल्या दिवशी, ठरलेल्या ठिकाणी, ठरलेल्या वेळी स्थगीत करुन नंतर अर्धातासाने घेण्यात येईल, अशा स्थगीत करुन घेतलेल्या गणसंख्येचे बंधन राहणार नाही. मात्र तशी टीप सभेचे सुचनेत देणे आवश्यक राहील.

९) **विशेष सर्वसाधारण सभा व तिचे कार्य :-**

१) वार्षिक सर्वसाधारण सभे व्यतिरिक्त होणारे सभेस विशेष सर्वसाधारण सभा समजले जाईल.

२) अशी सभा आवश्यकतेनुसार केव्हाही घेण्यात येईल.

३) जी कार्ये वार्षिक सर्वसाधारण सभा करु शकते ती सर्व कार्य करण्याचा अधिकार विशेष सर्वसाधारण सभेस राहील. तसेच संस्थेच्या हिताच्या दृष्टीने तातडीने निर्णय घेण्यात येईल.

१०) **संस्थेचे कार्यकारी मंडळाची रचना :-** या संस्थेचे कार्यकारी मंडळ ७ सभासदांचे राहील व त्यात पुढील प्रमाणे पदाधिकारी राहतील. अध्यक्ष-१, उपाध्यक्ष-१, सचिव-१, सहसचिव -१, कोषाध्यक्ष-१, व अन्य २ सभासद राहतील.

११) **कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ व निवडणुकीची पद्धत :-** कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ ५ वर्षाचा राहील. सर्वसाधारण सभेत सर्वानुमते कार्यकारी मंडळाचे सभासद निवडण्यात येईल. नवीन कार्यकारी मंडळ निवडून येईपर्यंत जुने कार्यकारी मंडळ हे संस्थेचे कामकाज पाहतील.

१२) **कार्यकारी मंडळातील पदाधिकारी व त्यांची कामे :-**

अ) **अध्यक्ष :-**

१) संस्थेचे होणारे सभांचे अध्यक्षस्थान स्विकारुन सभेचे कामकाज चालविणे.

२) संस्थेचे हितसंबंधाने ते आदेश देणे.

३) संस्थेचे कारभार व तिचे शाखांचे कारभारावर नियंत्रण ठेवणे.

४) कार्यकारी मंडळाच्या व सर्वसाधारण सभेच्या सूचना पाठविण्यात सचिवांना आदेश देणे.

**अध्यक्ष** **उपाध्यक्ष** **सचिव**

(17)

५) कार्यकारी मंडळाच्या सभेचे अध्यक्षपद स्विकारणे.

६) संस्थेच्या हितसंबंधासंबंधी आवश्यक ते निर्णय घेऊन सचिवाला आदेश देणे.

ब) **उपाध्यक्ष :-** अध्यक्षांचे गैरहजेरीत अध्यक्षाचे सर्व कामाची जबाबदारी सांभाळणे व अन्य वेळी अध्यक्षांना संस्थेचे कामात मदत करणे.

क) **सचिव :-**

१) संस्थेचे कार्यकारी मंडळाच्या व सर्वसाधारण सभेच्या सूचना पाठविणे व सभेचे आयोजन करणे.

२) संस्थेचे होणारे सभेचे ठराव लिहिणे.

३) संस्थेची कोर्ट कचेरीचे कामे पाहणे.

४) सभेत मंजुर झालेले ठराव अंमलात आणने.

५) संस्थेचे कार्यालयीन पत्रव्यवहार पाहणे.

६) संस्थेचे सर्व रेकॉर्ड सुरक्षित ठेवणे.

७) संस्थेचे कर्मचारी यांचेवर नियंत्रण ठेवणे.

८) संस्थेची स्थावर व जंगम मालमत्तेची सुरक्षा करणे.

९) संस्थेच्या जमाखर्चाचा ताळेबंद ठेवणे, सेवकावर देखरेख ठेवणे व त्यांना योग्यवेळी मार्गदर्शन करणे.

ड) **सहसचिव :-**

१) सचिवांच्या गैरहजैरीत त्यांची संपूर्ण कामे पाहणे.

इ) **कोषाध्यक्ष :-**

१) संस्थेचे आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे

२) संस्थेचे दैनंदिन जमाखर्च लिहीणे, हिशोबाच्या पुस्ताकावरुन वार्षिक पत्रके तयार करणे,

३) रकमेची देवाण-घेवाण करणे, ऑडीटर यांनी हिशोबातुन काढलेल्या त्रुटिची पुर्तता करणे.

४) जमाखर्चाची पत्रके व अंदाजपत्रक तयार करुन कार्यकारी मंडळाने सभेत मंजुरी करीता ठेवणे.

उ) **कार्यकारी मंडळाचे सदस्य :-** कार्यकारी मंडळाच्या सभेत व सर्वसाधारण सभेत उपस्थित राहणे, ठरावांवर मतदान करणे व संस्थेच्या कामात आवश्यक ती मदत करणे.

**१३) कार्यकारी मंडळाच्या सभा व मागणीची सभा :-**

१) कार्यकारी मंडळाच्या वर्षातून चार सभा होतील.

२) अध्यक्ष आवश्यकता भासल्यास सभा बोलवू शकेल.

३) संस्थेच्या १/३ सभासदांनी एखाद्या विषयावर चर्चा करण्यासाकरीता सभेची मागणी केल्यास मागणी केल्या दिवसापासून १५ दिवसांचे आत अध्यक्षांनी सभा बोलावणे आवश्यक राहील.

४) मागणीचे सभेला कार्यकारी मंडळाचे सर्व अधिकार राहतील.

५) अध्यक्षांनी अशी सभा न बोलविण्यास दोन सदस्यांच्या सहीने नोटीस काढून सभा घेण्यांत येईल. त्या सभेत घेतलेले निर्णय कार्यकारी मंडळास बंधनकारक राहील.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव

१४) **कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना व गणसंख्या :-**

१) कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना ७ दिवस अगोदर मिळेल अशी पाठविण्यात येईल.

२) निवडणुक बहुमताने होईल. निवडणुकीची सुचना १० दिवस अगोदर नोटीसेव्दारे सर्व सभासदांना देण्यात येईल.

३) नवीन कार्यकारी मंडळ निवडुण येईपर्यंत जुनेच कार्यकारी मंडळ कारभार पाहील.

१५) **कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीचे नियम सभेची सुचना व गणसंख्या :-**

१) ज्या सभासदाकडे संस्थेची कोणत्याही प्रकारची रक्कम घेणे बाकी आहे अशा सभासदास निवडणुकीत उमेदवार म्हणुन उभे राहता येणार नाही.

२) निवडणुकीच्या तारखेची सुचना १० दिवसांपूर्वी नोटीसव्दारे करावी.

४) नवीन कार्यकारी मंडळ निवडुन येईपर्यंत जुनेच कार्यकारी मंडळ कारभार पाहील.

१६) **कार्यकारी मंडळातील रिक्त जागा भरण्याबाबत :-** सभासदाचा राजीनामा, मृत्यु किंवा अन्य कारणाने कार्यकारी मंडळात जागा रिकामी झाल्यास ती जागा कार्यकारी मंडळाचे उर्वरीत सभासद उर्वरीत कालावधीकरीता सर्वसाधारण सभासदामधुन त्त्वरीत भरुन काढतील.

१७) **कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्य :-**

१) संस्थेत कारभारावर नियंत्रण ठेवणे.

२) सर्वसाधारण सभेने मंजुर केलेले ठरावाची पुर्तता करणे.

३) संस्थेचे जमाखर्च व अंदाजपत्रक मंजुर करणे.

४) सभासद किंवा पदाधिकारी यांचा राजीनामा मंजुर करणे.

५) कार्यकारी होण्याकरीता आलेल्या अर्जावर विचार करुन सभासद करुन घेणे किंवा सभासदस्यत्त्व नाकारणे.

६) कार्यकारी मंडळात रिकामी झालेली जागा भरणे.

७) आवश्यकतेनुसार संस्थेचे कामाकरीता कर्मचारी यांची नियुक्ती करणे किंवा त्यांना कामावरुन कमी करणे.

८) एखाद्या कामाकरीता समिती, उपसमिती नियुक्त करणे तिचे कामाची रुपरेषा ठरविणे किंवा नियुक्त केलेली समिती, उपसमिती बरखास्त करणे.

९) दरवर्षी संस्थेचे जमाखर्च ऑडीट करुन घेणे.

१०) संस्थेचे हिताचे दृष्टीने निर्णय घेणे.

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

(२१)

१८) **संस्थेचा निधी मिळकत व विनियोग** :- सभासद फी, वर्गणी, देणगी, अनुदान, शासकीय मदत हे संस्थेचे उत्पन्नाचे साधन राहील व त्याचा विनियोग संस्थेचे उद्देशावर करण्यात येईल.

१९) **उद्दीष्टे निहाय खर्चाची तरतुद :-** संस्थेचे उत्पन्नातून खालीलप्रमाणे उद्देशावर खर्च करता येईल. ३० % शैक्षणिक, ७०% सामाजिक,यावर खर्च करण्यात येईल.

२०) **कर्ज व ठेवी संबंधी तरतुद :-** संस्थेला आवश्यकता भासल्यास कोणीही व्यक्ती किंवा संस्थेच्या सभासदाकडुन अर्ज घेता येईल. परंतु त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज देणे नाही. तीरक्कम बिन व्याजी राहील. संस्थेला बँकेकडून कर्ज घ्यावयाचे असल्यास त्याकरीता मा. धर्मादाय सहा. आयुक्त, नागपूर यांची परवानगी घेण्यात येईल.

२१) **स्थावर मालमत्ता खरेदी विक्री बाबतीची तरतुद :-** संस्थेला उद्देशपुर्ती करीता संस्थेला कोणत्याही प्रकारची मालमत्ता खरेदी करता येईल. स्थावर मालमत्ता विक्री करावयाची असल्यास सर्व कार्यकारी मंडळातील सदस्यांचे मंजुरीने ठराव पास केल्याशिवाय व जॉईंट चॅरिटी कमिश्नर नागपूर यांचे लेखी पुर्व परवानगी शिवाय विक्री करु नये या शिवाय संस्थेला संस्थेच्या भविष्याच्या दृष्टीने स्थावर मालमत्ता सोडुन इतर चल मालमत्ता कार्यकार मंडळाच्या पुर्व परवानगीने विक्री व्यवहार करता येईल.

२२) **बँक खाते :-** संस्था कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत किंवा मान्यता प्राप्त शेड्युल बँकेत तसेच सहकारी बँकेत खाते उघडू शकेल. अध्यक्ष, सचिव व कोषाध्यक्ष यापैकी दोघांच्या संयुक्त सहीने बँकेत खाते उघडता येईल व रक्कम काढता येईल.

२३) **सभासदांची यादी ठेवण्याची पद्धत :-**

अ) संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १५ व संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियम १९७१ चे नियम १५ व अनुसुचित ६ या विहित नमुन्यात सदस्यांची यादी ठेवण्यात येईल.

ब) संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम ४ व संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियम १९७१ चे नियम ७ अनुसुचीत १ या विहित नमुन्यात संस्थेच्या कार्यकारी मंडळाची यादी मा. सहाय्यक संस्था निबंधक वर्धा यांचे कार्यालयात दरवर्षी पाठविण्यात येईल.

क) संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम ४-अ व संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियम १९७१ चे नियम ८ अनुसुचीत २ या विहित नमुन्यात संस्थेच्या कर्मचाऱ्यांची यादी मा. सहाय्यक संस्था निबंधक वर्धा यांचे कार्यालयात दरवर्षी पाठविण्यात येईल.

२४) **संस्थेचे नियम आणि नियमावलीत बदल करण्याची तरतूद :-** नियम व नियमावलीत बदल करावयाचा असल्यास सर्वसाधारण सभेत तसा ठराव घेवुन २/३ बहुमताने मंजुर झाल्यावर ते नवीन नियम करुन घेता येईल.

२५) **संस्थेचे नाव अथवा उद्देशात बदल करण्याची तरतूद :-** संस्थेचे नावात उद्देशात बदल अगर दोन संस्थेचे विलीनीकरण करावयाचे असल्यास संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १२ व १२-अ प्रमाणे कार्यवाही करावी लागेल.

२६) **संस्थेचे समाप्तीकरण अथवा विसर्जन :-** संस्थेचे कामकाज बंद करावयाचे असल्यास रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० चे कलम १३ व १४ प्रमाणे संस्थेचे विसर्जनाची कार्यवाही करण्यात येईल.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव

23

## दाखला

प्रमाणित करण्यात येते की, सदरची नियमावली ही **" न्यु आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज ॲल्युमिनी असोसिएशन ," वर्धा ता.जि. वर्धा** या संस्थेचे नियम आणि नियमावलीची सत्यप्रत आहे.

| अ.क्र. | सभासदाचे नाव | पत्ता | सह्या |
|---|---|---|---|
| १ | श्री. आशिष बबनराव ससनकर | रा. ५० निलम अपार्टमेंट,शासकीय प्रेस सोसायटी जयताळा रोड, नागपूर | |
| २ | श्री. हेमंत विलासराव मिसाळ | रा. प्रभु नगर, पोस्ट ऑफीस समोर, वर्धा ता.जि. वर्धा | |
| ३ | श्री. मदन भाऊराव इंगळे | रा. वार्ड नं. २१, तुकाराम वार्ड, राम नगर वर्धा ता.जि. वर्धा | |

Certified to be true copy

19/11/2020

Superintendent,
Public Trust Registration Office
WARDHA.

Typed by
Read by
Compared by
19/11/2020

अध्यक्ष  उपाध्यक्ष  सचिव